Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-VI JUN 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - IV Issue-VI JUNE 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# सहकार चळवळीतील तरूणांचा सहभाग व भूमिका

**डॉ. खंडेराव महादू कोतवाल**
सहयोगी प्राध्यापाक व वाणिज्य विभाग प्रमुख
कणकवली कॉलेज कणकवली,
जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२

तरूणाईच्या हाती सहकाराच्या ज्योती !
सहकारास येई भरती समृध्दीची !!

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम म्हणतात, २०२० साली भारत महासत्ता बनणार आहे. कारण जगात सर्वाधिक तरूणांची संख्या केवळ भारतातच आहे. स्वामी विवेकानंद म्हणायचे, मला तुम्ही बलदंड शरीर व खंबीर मन असलेले २०० युवक द्या, मी भारताला स्वातंत्र्य मिळवून देतो. हे खरं आहे, कारण वाळवंटाचे नंदनवन आणि पृथ्वीचा स्वर्ग बनविण्यासाठी ताकद फक्त तरूणांमध्ये आहे. श्रीकृष्णाने सवंगडयांच्या साथीने गोवर्धन पर्वत उचलला. रामायण, महाभारतामध्ये सहकार्याची अनेक उदाहरणे आपण आजपर्यंत अनुभवली आहेत. ज्याठिकाणी चांगल्या विचारांचे तरूण एकत्र येतात त्यांच्या सुपिक डोक्यातून चांगली कृती करण्याचे विचार येतात. या विचारातून चांगल्या गोष्टी आकार घेतात त्यालाच म्हणतात 'सहकार'. तरूण ज्या ज्या क्षेत्रात पाऊल टाकतात ती क्षेत्र झपाटयाने विकसित होतात हे आपल्याला संगणक आणि माहिती तंत्रज्ञान या बोलक्या उदाहरणव्दारे स्पष्ट होते. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी इतकी आहे. त्यामध्ये २५ टक्के म्हणजेच ३० कोटी तरूण आहेत. हे सर्व तरूण आपल्या देशाच्या सहकाराचे आधारस्तंभ आहेत. राजकीय क्षेत्राप्रमाणे सहकाराकडे हे तरूण आकर्षित झाले तर सहकाराचे सोने झाल्याशिवाय राहणार नाही. ग्रामीण भागाचा विकास होईल. देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल. तरूण हे अर्थव्यवस्थेचा कणा आणि सहकाराचा आधार आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या देशात सहकार चळवळ विकसित झाली. पंडित जवाहालाल नेहरूंच्या मते, "देशाचा विकास होण्यासाठी या देशातील खेडे-नं-खेडे सहकारी संस्थांनी वेढले पाहिजे." तर महात्मा गांधीजींनी स्वावलंबी खेडयांची संकल्पना मांडली. त्याच्या मते, "खेडयांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. म्हणून खेड्यांकडे चला, असा संदेश त्यांनी जनतेला दिला आहे." स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या कच्च्या मालावर आधारित उत्पादने केली तर खेडयातील प्रत्येक माणसाला काम मिळेल व तेथील लोकांच्या गरजा स्थानिक पातळीवर भागविता येतील. तशीच ताकद किंवा ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचे सामर्थ्य सहकारात आहे. आज खेडयांचा विकास झालेला दिसून येतो, तरूण मुले सुशिक्षित होतात पण ती नोकरीसाठी शहरांकडे धाव घेत आहेत.पदवीनंतर त्यांच्या पदरात नोकरीऐवजी बेकारी पडते. परंतु या तरूणांना सहकाराच्या माध्यमातून स्वयंरोजगार व रोजगाराची नामी संधी आहे. एक तरूण असे धाडस करु शकणार नाही पण काही तरुण एकत्र येऊन सहकारी संस्था सुरू करून, सहकाराच्या माध्यमातून स्वतःचा, कुटुंबाचा, संस्थेचा आणि गावाचा विकास करू शकतात. गाव पातळीवर लोकांच्या अडीअडचणी सोडवू शकतात.गावातील लोकांचे दारिद्रय नाहीसे करणे, बेकारी कमी करणे, कर्जबाजारीपणा कमी करणे, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा विकास करणे, सहकारातून लोकशाहीचे शिक्षण देणे, लोकांमध्ये प्रामाणिकपणा, विश्वास व सहकार्याची भावना निर्माण करणे, स्थानिक पातळीवर लोकांच्या गरजा पूर्ण करणे यासाठीच सहकार उदयास आला आहे. आज आपल्याला एका बाजूने खेडयांचा विकास दिसतोय तर दुसऱ्या बाजूला खेडयांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून तरुणांनी एकत्र येऊन सहकाराचा मार्ग चोखाळला पाहिजे. राजकारणामध्ये १८ वर्षे पूर्ण केलेल्या तरूणांना मतदानाचा हक्क देऊन आकर्षून घेतले आहे त्याप्रमाणे तरूणांना सहकाराकडे खेचून घेण्याची गरज आहे. तरच सहकाराच्या वृक्षाला नवीन पालवी फुटेल, चैतन्य बहरेल.

सहकारव्दारे शासकीय आणि खाजगी क्षेत्रामध्ये समन्वय साधला जातो. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब यांना चरितार्थाचे साधन म्हणून सहकार आधार ठरला आहे. शेती, शेतीपूरक व्यवसाय, स्वयंरोजगार, रोजगार, हस्तकला, लघुउद्योग, कुटिरउद्योग इ. पर्याय ग्रामीण भागातील लोकांना उपलब्ध झाले आहेत. साखर कारखान्यामुळे तेथील

परिसराचा सर्वांगीण विकास झालेला आढळून येतो.तसेच भारताचा जगात साखर उत्पादनामध्ये दुसरा क्रमांक लागतो. इतके सामर्थ्ये सहकारामध्ये आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात सहकारामध्ये पुढारलेले आहे. पश्चिम महाराष्ट्राचा विकास सहकाराच्या माध्यमातून झाला आहे. ज्या भागात सहकारी संस्था भक्कमपणे कार्यरत आहेत त्या भागात बेकारीचे प्रमाण कमी दिसून येते.आज ग्रामीण भागातील तरूण वेगवेगळया पदवीपर्यंतचे शिक्षण घेतात परंतु त्यांना नोकरी मिळत नाही. अशावेळी सहकारामध्ये त्यांना काम करण्याची संधी लाभल्यास त्यांना रोजगार मिळेल व सहकाराला काम करणारे दोन हात मिळतील. असे काम करणारे हजारो हात पुढे आले तर सहकारी क्षेत्राचा कायापालट व्हायला वेळ लागणार नाही. म्हणून सहकारी चळवळीमध्ये तरूणांना सहभागी करुन घेण्याची गरज आहे.

**सहकार चळवळीत तरूणांचा सहभाग यासाठी त्यांची भूमिका पुढीलप्रमाणे असावी असे मला वाटते.**

**१) सहकाराचे शिक्षण तरूणांनी घ्यावे-**

शाळा व महाविद्यालयामध्ये तरुणांनी सहकार या विषयाचा अभ्यास करावा. सहकार क्षेत्रात योगदान दिलेल्या नेत्यांचे व थोरांचे आदर्श अभ्यासावेत. उदा. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण, विखे पाटील, तात्यासाहेब कोरे, त्रिभुवनदास पटेल, डॉ. कुरियन वर्गीस, रत्नाप्पा कुंभार, साहेबराव सातकर इ. शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी ग्राहक सहकारी भांडार, कॅन्टीन सुरू करून त्यांमध्ये त्यांचा सहभाग असावा म्हणजे त्यांना सहकाराचे प्रात्यक्षिक ज्ञान उपलब्ध होईल. परिसरातील किंवा चांगले कार्य असणाऱ्या सहकारी संस्थांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यास सहली आयोजित कराव्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये दरवर्षी सहकार सप्ताहाचे आयोजन करावे त्यानिमित्ताने सहकारावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करावे. उदा. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्र इ. विद्यार्थी ग्राहक भांडार किंवा गावातील सहकारी दुकानाच्या व्यवस्थापन पदावर विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी दिल्यास त्याच्यातून भविष्यकाळात सहकाराला नवीन नेतृत्त्व लाभेल. म्हणूनच विद्यार्थी दशेत तरूणांच्या मनामध्ये सहकाराचे बीज पेरले पाहिजे. सहकार खात्यातील अधिकारी वर्ग, सहकारी संस्थातील पदाधिकारी यांची व्याख्याने विद्यार्थ्यांना ऐकविली पाहिजेत. सहकाराचे शिक्षण हा तरूणांना सहकाराची गोडी लावणारा पहिला टप्पा आहे.

**२) तरूणांनी सहकाराचे प्रशिक्षण घेणे-**

गावपातळीवर एखादी नवीन सहकारी संस्था स्थापन करताना जिल्हा उपनिबंधक कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन घेता येते. तसेच जिल्हा सहकार प्रशिक्षण मंडळामार्फत प्रशिक्षण घेऊन त्याआधारे सहकारी संस्थेची स्थापना करणे व कामकाज सांभाळणे इ. शक्य होते. महाराष्ट्रात ३१ जिल्हा सहकारी बोर्ड, ५ विभागीय सहकारी मंडळे, १३सहकार प्रशिक्षण केंद्र तसेच राष्ट्रीय पातळीवर वैकुंठ मेहता, राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्था,पुणे तसेच डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्था पुणे, डॉ. धनंजयराव गाडगीळ प्रबंध संस्था, नागपूर ही दोन महाविद्यालये कार्यरत आहेत याठिकाणी तरूणांना सहकार पदविका पूर्ण करता येते. ‘‘सहकारी महाराष्ट्र’’, ‘‘सहकारी जगत’’ या दोन मासिकांव्दारे सहकाराबाबतचे ज्ञान प्राप्त करता येते.

तरुणांनो, सहकारी शिक्षण — प्रशिक्षणाची धरा कास,<br>होईल सहकाराचा खरा विकास

**३) एक गाव एक सहकारी संस्था-**

प्रत्येक गावातील किमान ११ तरूणांनी एकत्र येऊन किमान एक सहकारी संस्था सुरू करावी. सुरूवातीला किराणा भुसार, स्टेशनरी, गृहपयोगी वस्तू, शेतकऱ्यांना लागणाऱ्या वस्तू इ. ची विक्री या दुकानाव्दारे करता येईल. गावातील विद्यार्थ्यांसाठी स्टेशनरी मालाचे दुकान, घरगुती गरजेसाठी दैनंदिन वस्तू, भाजीपाला, फळे, हॉटेल, खाद्यपदार्थ इ. ची विक्री करता येईल.शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून जनावरे पाळावीत. तरूणांनी गाव पातळीवर ‘दूध डेअरी’ सूरू करावी. या संस्थांचे कामकाज तरूणांनी पहावे. गावाच्या गरजा विचारात घेऊन आणखी सहकारी संस्थां सुरू करता येतील. या सहकारी संस्थांमध्ये गावातील अधिकाधिक लोकांना सभासद म्हणून सामावून घेणे. गावातील तरूणांना गावपातळीवर स्वयंरोजगार व रोजगार उपलब्ध होईल.गावाचा, सभासदाचा आणि तरूणांचा विकास होईल. गावाला पिण्याच्या पाण्याची सोय करणे, शेतीसाठी जलसिंचन सुविधा उपलब्ध करणे,गृहबांधणी सहकारी संस्थेची स्थापना करुन सभासदांना घरे बांधून देणे, कारागीरांना काम उपलब्ध करून देणे इ.

**४) विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करणे-**

गाव पातळीवर आर्थिक गरजा भागविण्यासाठी नागरी पतसंस्था, ग्रामीण पतसंस्था, बिगर शेती पतसंस्था, मजुरांसाठी सहकार संस्था, कारागीर संस्था, जंगल कामगार संस्था, शेतीपूरक व्यवसायाच्या सहकारी संस्था उदा. डेअरी, पोल्ट्री, पशूपालन, रेशीम उत्पादक सहकारी संस्था, फळ बी प्रक्रिया संस्था, फळ बागायतदार सहकारी संस्था,खरेदी विक्री संघ इ. कच्च्या मालावर प्रक्रिया करून उत्पादित मालाव्दारे गावातील लोकांच्या गरजा भागविता येतील. तरूणांना रोजगाराची संधी लाभेल, खेडी स्वावलंबी बनतील.

**५) सहकारी कार्यकर्ता म्हणून काम करणे-**

गावातील तरूणांनी सहकारी संस्थांमध्ये स्वतः काम केले पाहिजे. व्यवस्था कमिटीमध्ये सहभागी होऊन संस्थेचे दैनंदिन कामकाज, व्यवस्थापन, आर्थिक व्यवहार इ. बारकाईने पाहिले पाहिजे. संस्थेचा सेवक या नात्याने सेवाभावी वृत्तीने काम केले पाहिजे. त्यामुळे सभासदांचा संस्थेवरील विश्वास वाढेल. मी संस्थेचा सेवक आहे, संस्थेच्या विकासात माझा विकास आहे. म्हणून संस्थेची सेवा प्रामाणिकपणे केली पाहिजे. संस्थेचे व्यवहार चोख व पारदर्शक ठेवले पाहिजेत. सहकाराव्दारे दाणेदार साखर व खते निर्माण करता आली परंतु बाणेदार माणसे बोटाच्या संख्येइतकीच तयार करता आली म्हणून तरूणांनी संस्था पातळीवर नेतृत्व करायला शिकले पाहिजे. संस्थेतील सर्वांना आपल्याबरोबर घेऊन काम करता आले पाहिजे. नेतृत्व हे आदर्श असावे त्याचे इतरांना अनुकरण करायला आवडले पाहिजे.

**६) सामाजिक बांधिलकीची जोपासणा करणे-**

सहकार ही सामाजिक चळवळ आहे. दैनंदिन कामामध्ये सहकारातील तत्त्वांचे पालन व सहकाराचे ब्रीद ध्यानात ठेवले पाहिजे. उदा. ‘‘विना सहकार नहीं उध्दार’’. संस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सामावून घेऊन त्यांच्यामध्ये सांघिक भावना निर्माण केली पाहिजे. उदा. ‘‘एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ.’’ प्रत्येकाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तर संस्थेचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. संस्था किंवा समाज माझ्यासाठी काय करतो यापेक्षा मी संस्था व समाजासाठी काय करतो? असा प्रश्न स्वतःला विचारा. त्याचे उत्तर आहे सामाजिक बांधिलकी ती जपा जोपासा आणि वृध्दींगत करा. त्यातून समाजाशी चांगले नाते निर्माण होते.

**७) संस्थेची गुणवत्ता विकसित करून तिचे संवर्धन करा-**

जपानने औद्योगिक क्षेत्रात फिनीक्स पक्ष्याप्रमाणे प्रगती साधली आहे. आज जपान हा देश औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर आहे. तेथे सतत कामामध्ये विकसित बदल केला जातो. त्याचे आपल्या देशातील युवकांनी अनुकरण केले पाहिजे. हेन्री फेऑलची व्यवस्थापनाची तत्त्वे, फेड्रीक टेलर यांचे शास्त्रीय व्यवस्थापन, एडवर्ड डेमींग यांचे एकूण गुणवत्ता व्यवस्थापन इ. चा अवलंब करून कामाचा दर्जा आय. एस्.ओ. (ISO) स्वरुपाचा निर्माण करुन तो टिकविला पाहिजे. गुणवत्ता व्यवस्थापन ही केवळ विचारसरणी नसून ती एक जीवनशैली आहे. उदा. वारणा , अमूल, गोकूळ इ. दुधाचे पदार्थ दर्जेदार तयार करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गुणवत्ता सिध्द केली आहे. चांगल्या कामामुळे, गुणवत्तेच्या उत्पादनामुळे पारदर्शक व्यवहारामुळे व सेवाभावी कामकाजामुळे संस्थेला हिशेब तपासणीची ‘अ’श्रेणी प्राप्त करता येते.

**८) महिलांना सहकारी संस्थांमध्ये सहभागी करुन घेणे.**

सध्या सर्वच क्षेत्रात महिलांना ५० टक्के आरक्षण देण्सात आलेले आहे. तरुणांनी- तरुणींना सह. संस्थांमध्ये सहभागी करुन घ्यावे. संस्थेच्या व्यवस्थापन कमिटीमध्ये महिलांसाठी राखीव पद असते त्यांचा त्यांना लाभ दिला पाहिजे. सरकारातील भ्रष्टाचार रोखणे, गैरव्यवहारांना आळा घालणे, पारदर्शक व्यवहार करणे, सहकारी तत्त्वांचा अवलंब करणे इ. साठी महिलांचा सहभाग अत्यावश्यक आहे. महिला प्रामाणिक, कष्टाळू आणि काटकसरीने काम करतात. सहकार रुपी प्रपंचाचे एक चाक तरुण तर दुसरे चाक तरुणी असतात.सहकारचा रथ वेगाने पुढे न्यायचा असेल तर दोन्हीही चाकांना समान संधी दिली पाहिजे.

**९) सहकारी क्षेत्रातील आव्हाने स्विकारणे -**

सहकारी क्षेत्राला सरकार व खाजगी क्षेत्राबरोबर स्पर्धा करावी लागत आहे. भारताने १९९१ पासून खुल्या अर्थव्यस्थेचा अवलंब केला आहे. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण ही सहकारासमोरील आव्हाने आहेत. स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करण्यासाठी वस्तू व सेवांचा दर्जा निर्धारण, गुणवत्ता नियंत्रण, एकूण गुणवत्ता व्यवस्थापन, पारदर्शकता, नैतिकता आणि सेवाभाव इ. बाबी आवश्यक आहेत. तरुणांनी ही आव्हाने स्विकारली पाहिजेत.

**१०) लोकांची मानसिकता तयार करणे-**

सहकाराबाबत लोकांचा सकारात्मक दृष्टिकोन तयार केला पाहिजे. ग्रामीण विकास व परिवर्तनाचे एकमेव साधन म्हणजे सहकार. सहकाराचे बीज पेरून त्याचा वटवृक्ष फुलविला तर त्याच्या सावलीचा लाभ मानव, पशू-पक्षी, जनावरे इ. ना घेता येतो. हा व्यापक दृष्टिकोन बाळगून तरुणांनी अशी प्रतिज्ञा करावी की,

तरुणांनो घ्या हातात हात!
अन् द्या सहकाराला साथ!!

**निष्कर्ष:-**

सहकाराव्दारे गुजरात येथील आनंद दूध प्रकल्प, कोल्हापूर येथील येळगूड दूध प्रकल्प, वारणानगर दूध प्रकल्प, पुणे येथील कात्रज दूध प्रकल्प, महाराष्ट्रातील साखर कारखाने इ. ठिकाणचा परिसर हा औद्योगिक बनला आहे. या परिसरातील प्रत्येक कुटुंबाचे नाते सहकाराशी जोडले आहे. याचे कारण त्या परिसरातील युवक सहकारी क्षेत्रामध्ये पुढाकार घेऊन काम करत आहेत. नोकरीऐवजी दूध व्यवसाय करणारे युवक भरपूर पैसा कमवतात तसेच ग्रामीण भागातील स्वच्छ व निरोगी हवामानातील जीवन आनंदाने जगतात. शेती, शेतीपूरक व्यवसाय, नोकरी, व्यापार इ. सांभाळून वेगवेगळया सहकारी सोसायट्यांच्या व्यवस्थापन समितीचे काम सांभाळताना तसेच आपल्या कुटुंबाच्या आर्थिक विकासातून राहणीमान सुधारत गावाचा विकास करतानाआढळून येतात. अशी दिशा किंवा मार्ग ग्रामीण भागाच्या सर्व खेडेगावातील युवकांनी स्विकारला तर प्रत्येक खेडे स्वावलंबी होईल व ग्रामीण भागाच्या विकासाव्दारे देशाचा विकास हाईल. यासाठी देशातील युवकांना सहकाराकडे वळविण्याची गरज आहे.आपणच आपला विकास करू शकतो हा विश्वास व दिलासा त्यांना हवा आहे.

**संदर्भ :**

१) Singh L. P. Co-operative Marketing in India and Abroad, Himalaya publishing House, Mumbai, 2000.
२) Sinha B. P., Co-operative Instrument for Socio-economic Justice, Himalaya Publishing House, Mumbai, 1992.
३) अहिरराव, टकले, मुळे, कुरपटवार, सहकार, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००५
४) कायंदे–पाटील गंगाधर वि., सहकार, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक-१३, २००५
५) कायंदे-पाटील गंगाधर वि., भारतातील सहकार, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक-१३, २००५
६) कायंदे-पाटील गंगाधर वि., सहकार आणि ग्रामिण विकास, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक-१३, २००५
७) कुलकर्णी पी. आर., सहकार तत्व आणि व्यवहार, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर - १०, १९९०.
८) जोशी सी. जी., सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर-१२, २०००
९) भोसले दामजी, सहकार, फडके प्रकाशन, कोल्हापूर-१२, २००७.
१०) सराफ दापके, सहकार, विद्या प्रकाशन, नागपूर-२, १९९१.
११) सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकार शिक्षण व प्रशिक्षण भवन, पुणे -४११००१
१२) सहकारी जगत, महाराष्ट्र राज्य सहकार शिक्षण व प्रशिक्षण भवन, पुणे-४११००१.